# दिनांक २८/०६/२०११ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र सभेचे इतिवृत्त

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांचे उपस्थितीत दि.२८/६/२०११ रोजी सायंकाळी ०४.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, रत्नागिरी येथे संपन्न झाली. या सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र | विषय | उपस्थित केलेल्या संस्थेचे / घटकाचे नांव | संबंधीत खाते / कार्यालय | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| | दिनाक ३०/०४/२०११ रोजी संपन्न झालेल्या सभेंचे इतिवृत्त मंजूर करणे. | | जिल्हा उद्योग केंद्र | दि.३०/०४/२०११ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्तास सभगृहाने मान्यता दिली. |
| १. | **लोटे औद्योगिक क्षेत्रामध्ये अतिक्रमण हटविणेबाबत (दि.२९-०३-२००७)** | लोटे परशुराम इंड. असो. लोटे | कार्य.अभि. म.औ.वि.मं. चिपळूण | लोटे औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमाणे हटविणेचे मुद्यावर दि.३०-०४-२०११ रोजी झालेल्या सभेत चर्चा झाली असता पोलीस बंदोबस्तासाठी होणा-या खर्चाचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला असून सदरचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर अतिक्रमणे हटविण्याची तारीख निश्चित करण्यात येत आहे अशी माहिती कार्यकारी अभियंता, एमआयडीसी यांनी सभेस दिली.<br>त्यावर मा.अध्यक्षांनी पुढील सभेपर्यंत कोणत्याही परिस्थितीत मुख्यालयाकडे पाठपुरावा करुन मंजूरीची कार्यवाही पूर्ण करावी अशा सूचना दिल्या. |
| २. | **एमआयडीसी लोटे येथील जल शुध्दीकरण केंद्रामध्ये जनरेटर बसविण्याबाबत (दि.२४-०६-२०१०)** | लोटे परशुराम इंडस्ट्रिज असोसिएशन | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, रत्नागिरी | एमआयडीसी लोटे येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी महावितरण कंपनीकडून एक्स्प्रेस फीडर वरुन वीजपुरवठा घेण्यासाठी ट्रान्स्फॉर्मर आलेले असून त्यांचे टेस्टींगचे काम महावितरणकडून करुन घेऊन ट्रान्स्फॉर्मर बसविण्याचे काम १५ दिवसात करण्यात येत असल्याची माहिती एमआयडीसीकडून देण्यात आली.<br>त्यावर मा.अध्यक्षांनी सदरचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत सुचविले. |
| ३. | **जे.के.फाईल्स, रत्नागिरी येथें डिव्हायडर व सिग्नल यंत्रणा बसविण्याबाबत (दि.३१-०८-२०१०)** | लघु उद्योग संघटना, रत्नागिरी | पोलीस अधिक्षक रत्नागिरी व कार्यकारी अभियंता | जे.के.फाईल्स रत्नागिरी येथे अपघातांचे प्रमाण वाढले असून तेथे साळवी स्टॉप ते जे.के.फाईल्स येथे रस्ता दुभाजक व सिग्नल यंत्रणा बसविण्यात यावी तसेच एमआयडीसी मध्येही जे.के.फाईल्स जवळ गतीरोधक बसवावा अशी मागणी लघु उद्योग संघटना, रत्नागिरी यांचेकडून करण्यात आली आहे.<br>जे.के.फाईल्स येथील जाळी दुरुस्तीचे काम एमआयडीसीकडून करण्यात आल्याची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, (दक्षिण) रत्नागिरी | माहिती देण्यात आली. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हद्दीत येतो किंवा एमआयडीसी च्या हद्दीत येतो याबाबत अधिक्षक भूमी अभिलेख, रत्नागिरी यांचेकडून मोजणी करुन घेऊन खात्री करावी आणि संबंधितांनी ते काम करावे अशा सूचना मा.अध्यक्षानी दिल्या.<br>तसेच, जे.के.फाईल्स येथील अपघातांचे वाढते प्रमाण पहाता, पीक अवर्स मध्ये ट्रॅफिक पोलीसची सुविधा करण्यात येईल असे पोलीस उपअधिक्षक यांनी सभागृहास सांगितले.<br>त्यावर मा.अध्यक्षांनी सदरची कार्यवाही त्वरित करण्याचे निर्देश दिले. |
| ४. | **महाराष्ट्रातील जिल्हयांच्या विकासात उद्योगपतींचे योगदान होणेबाबत** | श्री. सूर्यकांत कुलकर्णी, सामाजिक आर्थिक विकास संस्था, परभणी | जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी | राज्यातील मोठया कंपन्यांच्या श्रीमंतीचा फायदा इथली गरीबी कमी करण्यात आणि संपवण्यात व्हायला हवा. म्हणजे मोठया आणि फायद्यात चालणा-या कंपन्यांना प्रत्येकी २-४ जिल्हे वाटून द्यावेत आणि त्यांनी तेथे काम करावे. त्यांनी तेथील परिस्थितीचा अभ्यास करावा आणि त्या जिल्हयांचा विकास आराखडा तयार करावा. २-४ वर्षाचे नियोजन असावे. तेथील विकासात शासनाच्या योजना आणि त्यासाठी आवश्यक तेवढे पैसे शासन देईलच परंतु त्याचबरोबर या कंपनीने त्यांचेही पैसे विशेषत : त्यांची मॅनेजमेंट, चातुर्य वापरुन सर्व काही नियोजनाप्रमाणे होईल याची खबरदारी घ्यावी. म्हणजे पुढील २-४ वर्षात राज्यात फार मोठया प्रमाणावर सुधारणा होण्याची शक्यता आहे. असे निवेदन मा.विकास आयुक्त(उद्योग) मुंबई यांचेकडे श्री.सूर्यकांत कुलकर्णी , सामाजिक आर्थिक विकास संस्था, परभणी यांनी सादर केले आहे. जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकीत घेवून जिल्हयातील उद्योजकांना/औद्योगिक संघटनांना याबाबत माहिती देवून जिल्हयाच्या विकासात उद्योगपतींना योगदान देण्याबाबत आवाहन करण्याच्या सूचना मे.निमंत्रक,उद्योग मित्र, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.उ.मि./संकीर्ण/उयो/२०१०/६६७ दि.०९ नोव्हेंबर २०१० च्या पत्रान्वये कळविले आहे.<br>दि.३१-१२-२०१० रोजी झालेल्या सभेतील चर्चेनुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सदरबाबत स्वतंत्र टिप्पणी ठेवून ३० मोठया उद्योगांना त्याप्रमाणे या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिउके/रत्ना/ सभा /२०११/ १८३४दि.१९-०१-२०११ अन्वये कळविण्यात आले असल्याची माहिती मा.व्यवस्थापक, जिउके यांनी सभागृहास दिली.<br>**सदरबाबत मे.दाऊ ॲग्रो सायन्सेस, ए-१, एमआयडीसी, लोटे पर्शुराम, ता.खेड यांचेमार्फत लोटे पर्शुराम च्या परिसरातील गावांमध्ये करण्यात येणा-या विकासात्मक** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **कामांची माहिती त्यांचे पत्र दि.०१ मार्च २०११ अन्वये कळविलेली माहिती मागील सभेत सादर करण्यात आली.**<br>जिल्हा उद्योग केंद्राकडून पत्र क्र.जिउके/रत्ना/जिउमि/सभा/२०११/५६९१ दि.०४-०५-२०११ अन्वये उद्योग संघटनांना यादी पाठविण्यात आली असल्याची माहिती मा.महाव्यवस्थापक यांनी सभेत दिली.<br>सदरबाबत रत्नागिरी चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री.पटवर्धन यांनी सदरबाबतची माहिती मोठया उद्योगांना संपर्क साधून संकलित करुन सदरची माहिती जिल्हा उद्योग केंद्रास पुरविणार असल्याचे सांगितले.<br>तसेच, मोठया उद्योगांची सभा घेण्याबाबत लघु उद्योग संघटना रत्नागिरी यांचेकडून सुचविण्यात आले असता, मा.अध्यक्षांनी त्यास मान्यता दिली. |
| ५. | **सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रोत्साहने उपभोगलेल्या व कार्यकालावधीत बंद झालेल्या घटकांकडून प्रोत्साहनांची वसुली** | | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी<br>जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी | सामुहिक प्रोत्साहन योजनेचे लाभ घेऊन कार्यकालावधीत बंद झालेल्या घटकांकडून प्रोत्साहन वसुली बाबत शासनाने कार्यपध्दती उद्योग ऊर्जा विभागाच्या दि.२२-११-२०१० चे शासन निर्णयाद्वारे निश्चित केली आहे. या योजनेनुसार सामुहिक प्रोत्साहनांचा लाभ घेतलेला उद्योग घटक शेवटच्या आर्थिक लाभापासून पुढे सलग पाच वर्षे उत्पादनात रहाणे आवश्यक आहे. तसेच या उद्योग घटकाने सामुहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ घेतलेपासून पुढे पाच वर्षे पर्यंत विहित नमुन्यात वार्षिक विवरणपत्रे सादर करणे आवश्यक असलेचे नमूद केले आहे. अशा कार्यकालावधीत बंद पडलेल्या तसेच विहित नमुन्यात वार्षिक विवरणपत्रे सादर न करणा-या उद्योग घटकांकडून सामुहिक प्रोत्साहन वसुलीकरिता उद्योग घटकांचे प्रस्ताव वसुली करता महसुली वसुली प्रमाणपत्राद्धारे मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेच्या सूचना आहेत.अशी माहिती मा. महाव्यवस्थापक यांनी सभेस दिली.<br>तरी, सर्व कार्यरत उद्योग घटकांनी आपले वार्षिक उत्पादन अहवाल विहीत मुदतीत (३१ जानेवारी २०११ पूर्वी) सादर करावेत. असे आवाहन मा.महाव्यवस्थापक यांनी दि.३१-१२-२०१० रोजी झालेल्या सभेत केले होते.<br>सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या उद्योग घटकांनी वार्षिक विवरणपत्रे सादर करण्याच्या तरतुदीनुसार विवरणपत्रे सादर करण्याकरिता ६२६ उद्योग घटकांना नोटीसा पाठविल्या. तथापि,२३५ घटकांनी माहिती पाठवली आहे. २३ घटकांनी मुदत मागितली आहे. उर्वरित ३६८ उद्योग घटकांची माहिती अद्यापही प्रलंबित आहे.<br>या घटकांनी माहिती सादर करण्याकरिता औद्योगिक संघटनांनी आपल्या स्तरावरुन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विवरणपत्रे सादर करण्यासाठी मार्गदर्शित करणेस मा.व्यवस्थापकांनी केले.<br>याबाबत चर्चा झाली असता, सदरच्या याद्या लघु उद्योग संघटनांना दिल्यास सदरची माहिती संघटनांकडून गोळा करुन जिल्हा उद्योग केंद्रास पुरविण्यात येईल असे लघु उद्योग संघटनेचे श्री.जोशी यांनी सभागृहास सांगितले. सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विवरणपत्रे सादर न केलेल्या उद्योग घटकांच्या याद्या औद्योगिक संघटनांना लवकरच पुरविणेत येत असल्याची माहिती मा.महाव्यवस्थापकांनी सभागृहास दिली.<br>त्यावर मा.अध्यक्षांनी सदरप्रमाणे कार्यवाही करण्यास सूचविले. |
| ६. | एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड लिलाव पध्दतीने वाटप करण्याची प्रक्रीया सध्या थांबवून पूर्वी प्रमाणेच प्लॉट वाटपाची कार्यवाही एमआयडीसी कार्यालयाकडून व्हावी | लघु उद्योग संघटना, रत्नागिरी | क्षेत्रीय अधिकारी, एमआयडीसी रत्नागिरी | एमआयडीसीने भूखंड वितरणाची प्रणाली लिलाव पध्दतीने न करता पूर्वीच्याच प्रमाणे भूखंड वाटप प्रक्रीयेचा अवलंब करावा अशी मागणी संघटनेचे श्री.ईर्शाद काझी यांनी मागील सभेत केली. यावर सभागृहात चर्चा झाली असता सदरची बाब धोरणात्मक असल्याने राज्य उद्योग मित्र समितीमध्ये चर्चेसाठी पाठविण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले. विषय सूचीवरुन वगळण्यास सभागृहाने मान्यता दिली. |
| ७. | **उद्योग घटकामधील वीज मीटरची जागा बदलणेबाबत.** | रत्नागिरी चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज रत्नागिरी | अधिक्षक अभियंता, महावितरण, रत्नागिरी | जुन्या उद्योग घटकांमध्ये वीज मीटर हे घटकाच्या इमारतींच्या आतील बाजूला बसविण्यात आले असून सदरचे वीज मीटर घटकाच्या प्रवेशद्वाराजवळ बसवून घेण्याबाबत महावितरणकडून कळविण्यात आले असून सदर प्रमाणे बदल करण्याकरिता घटकाला निरनिराळ्या प्रक्रीया पार पाडाव्या लागणार आहेत जसे की, Drawing Approvals, Permissions इ. काही उद्योग घटकांचे वीज मीटर पासून प्रवेशद्वारापर्यंतचे अंतर जास्त असल्याने मीटरची जागा बदलणे खर्चिक होणार आहे. तसेच, सदरच्या सर्व प्रक्रीयेमध्ये घटकाला आपला कारखाना बंद ठेवावा लागणार असल्याने घटकाचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे मीटरची जागा त्वरित बदलणे उद्योग घटकांना शक्य होणार नाही.परिणामी, सदरबाबत महावितरण कडून किमान एक वर्षाची मुदत मिळावी अशी मागणी रत्नागिरी चेंबर ऑफ कॉमर्स, रत्नागिरी यांचेकडून करण्यात आली आहे.<br>सदरची बाब ही धोरणात्मक बाब आहे. परंतु, ज्या उद्योग घटकांना अशा प्रकारे वीज मीटर त्वरित स्थलांतरित करण्यात तांत्रिक अडचणी आहेत. अशा उद्योग घटकांनी विनंती केल्यास त्यांना योग्य तो अवधी वाढवून देण्याबाबत विचार करता येईल. वीज मीटर स्थलांतराच्या कामासाठी वीज पुरवठा बंद करावा लागणार नाही. असे महावितरण कडून सांगण्यात आले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **नवीन विषय :-** | | | |
| १. | **ब्रॉड बँड इंटरनेट सेवा व रेग्युलर फोन सेवा व्यवस्थित चालत नसल्याबाबत. (२८-०६-२०११)** | लोटे परशुराम इंडस्ट्रिज असोसिएशन | भारत संचार निगम लि. | लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये भारत संचार निगम कडुन मिळणारी ब्रॉड बँड इंटरनेट सेवा व रेग्युलर फोन सेवा ही पावसाळयाच्या कालावधीमध्ये वारंवार खंडित होत आहे.सदरबाबत उद्योजकांकडून संघटनेकडे वारंवार तक्रारी होत असल्याने सदरची सेवा व्यवस्थित सुरु करण्यात यावी अशी मागणी लोटे परशुराम इंड्स्ट्रिज असोसिएशन यांचेकडून करण्यात आली.<br>सदरबाबत बीएसएनएलकडून योग्य ती कार्यवाही त्वरित करण्यात यावी अशा सुचना प्रतिनिधी, बीएसएनएल यांना दिल्या. तसा अहवाल पुढील सभेत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. |
| २. | **लोटे पर्शुराम औद्योगिक वसाहतीमधील रस्ते दुरुस्तीबाबत. (२८-०६-२०११)** | लोटे परशुराम इंडस्ट्रिज असोसिएशन | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, रत्नागिरी | लोटे पर्शुराम औद्योगिक वसाहतीमध्ये कित्येक ठिकाणी रस्ते खराब झाले आहेत. सदर रस्ते अतिशय धोकादायक झालेले असल्याने त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी व पावसाळी पाणी निच-यासाठी जागाजागी मो-या व गटारे पाहिजेत त्या ठिकाणी नसल्यामुळे रस्त्यावरुन पाणी वाहून रस्ते खराब होण्याचे प्रकार वाढले आहेत तरी त्वरित मो-या व गटारे बांधून द्याव्यात कि जेणेकरुन पावसाळयामध्ये येथून वाहणा-या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होईल व जागोजागी पाणी साठून रहाणार नाही. अशी मागणी लोटे पर्शुराम इंड्स्ट्रीज असोसिएशन यांचेकडून करण्यात आली.<br>सदरबाबत चर्चा झाली असता, सदरचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तीन आठवडयांत रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण होईल असे एमआयडीसी कडून सांगण्यात आले.<br>सदरबाबत कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी सभेत दिल्या.<br>तसेच, एमआयडीसीने महावितरण व औद्योगिक संघटना यांची एकत्रित बैठक दर महिन्याला घ्यावी व संघटनांच्या छोटया छोटया अडचणी त्यांच्या स्तरावर सोडवाव्यात अशा सूचना या पूर्वी देण्यात आल्या होत्या. सदर प्रमाणे बैठक घेतली जात नसल्याने मा.अध्यक्षांनी सदर प्रमाणे दर महिन्याला बैठक घेण्याच्या सूचना पुनश्च दिल्या. |
| ३. | **लोटे पर्शुराम औद्योगिक वसाहतीमध्ये विजेच्या अनियमितते बाबत. (२८-०६-२०११)** | लोटे परशुराम इंडस्ट्रिज असोसिएशन | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, रत्नागिरी | लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये महावितरणकडून कमी जास्त दाबाने वीज पुरवठा होणे वारंवार वीज पुरवठा खंडीत होणे बरेच वेळा व्होल्टेज कमी जास्त होण्याचे प्रमाण लक्षणिय आहे. त्यामुळे मशीनरी मोटर्स जळण्याचे प्रकार होऊन उत्पादनावर याचा परिणाम होत आहे. उत्पादन चालू असताना अचानक वीज पुरवठा ंडीत होत असल्याने उत्पादनाचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | नुकसान होउुन तोटा होत आहे त्यामुळे सदरच्या अडचणीवर त्वरित उपाय योजना करण्याबाबत लोटे पशुराम इंडस्ट्रीज असोसिएशन कडून मागणी करण्यात आली.<br>सदरबाबत महावितरण कडून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. महावितरण आणि एमआयडीसी कडून उद्योजकांच्या छोटया छोटया समस्यांचे निराकरण वेळीच केले जात नसले बद्दल तसेच वारंवार त्याच समस्य उद्योग मित्र कडे येत असलेने या बाबी संबंधित विभागांचे मुख्य अधिकारी यांचे निदर्शनास आणणे करिता मा.श्री.अजय मेहता, व्यवस्थापकीय संचालक, महावितरण आणि मा.श्री. के. शिवाजी, मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना मा.अध्यक्षांच्या सहीने अर्धशासकीय पत्र पाठविण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. |
| ४. | **एमआयडीसी रत्नागिरी येथील पाणी पुरवठा सुधारण्याबाबत.** (२८-०६-२०११) | लघु उद्योग संघटना रत्नागिरी | कार्यकारी अभियंता,एम आयडीसी, रत्नागिरी | लघु उद्योग संघटना, रत्नागिरी यांनी एमआयडीसी रत्नागिरी येथील पाणी पुरवठा सुधारण्याबाबत खालीलप्रमाणे अडचणींचे निराकरण करण्याबाबत मागणी केली आहे :-<br>१.हरचेरी येथील जॅकवेल येथे असलेले इलेक्ट्रीक पंपींग स्टेशन मध्ये जनरेटरची सुविधा नाही. वीज पुरवठा वारंवार खंडीत झाल्यामुळे पाण्याचे पंपींग होत नाही.त्यामफहे लवकरात लवकर तेथे जनरेटरची सोय करणे आवश्यक आहे.<br>२.जोरदार पाऊस झाल्यानंतर अनेक वेळा पंपींग स्टेशन मधील पंप पाण्याखाली जातात व त्यामुळे वीज पुरवठा असूनही पाण्याचे पंपींग करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत अनेक दिवस एमआयडीसी परसरात पाणी पुरवठा केला जात नाही. त्यामुळे पंपींग स्टेशनची उंची वाढविणे आवश्यक आहे.<br>सदरबाबत, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, रत्नागिरी यांनी मा.मुख्य अभियंता, महावितरण, रत्नागिरी यांना त्यांचे पत्र क्र.उ.अ.(वि/यां)रत्ना/७९१/सन २०११ दि.२३-०६-२०११ अन्वये राजापूर फिडरवरुन होणा-या विद्युत पुरवठयाऐवजी हरचेरी येथे फिनोलेक्स(पावस) फिडरवरुन विद्युत पुरवठा जोडून मिळण्याबाबत कळविले आहे.<br>विषयक चर्चेत उद्योजकांचे संबंधीत अधिकारी उद्योजकांचे प्रश्नाना समाधानकारक उत्तर देवू न शकल्याने मा. अध्यक्षांनी असमाधान व्यक्त केले. सदर विषयी मा.श्री. के. शिवाजी, मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई व मा.श्री.अजय मेहता, व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना मा.अध्यक्षांच्या सहीने अर्धशासकीय पत्र पाठविण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | **एमआयडीसी रत्नागिरी येथील उद्योजकांची बांधकाम / रस्ते संदर्भातील अडचणी दूर करणेबाबत (२८-०६-२०११)** | लघु उद्योग संघटना रत्नागिरी | कार्यकारी अभियंता,एम आयडीसी, रत्नागिरी | लघु उद्योग संघटना, रत्नागिरी यांनी एमआयडीसी रत्नागिरी येथील उद्योजकांची बांधकाम / रस्ते संदर्भातील खालील अडचणी दूर करण्याबाबत मागणी केली आहे.<br>१. रस्त्यावर टाकलेले स्पीड ब्रेकर ना दुरुस्त व त्यावर पांढरे पट्टे मारलेले नाहीत.<br>२. पावसाळा चालू झाला असल्याने सर्व गटारे उपसणे व पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल याकडे लक्ष देणे.<br>३. रोड साईड ते कंपाउंड वॉलमध्ये वाढलेली झाडे तोडणे संदर्भात विनंती करुन सुध्दा अद्याप अंमलबजावणी केलेली नाही.<br>४. F.C.I. गोडावून ते प्रवीण ट्रेडर्स व ऑफीस शेजारील समोरच्या रोडवरील नधिकृत ट्रक पार्कींग संदर्भात सूचना देवुनही त्यावर अंमलबजावणी झालेली नाही. त्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे.<br>५. पाटीदार सॉ मिल शेजारी रेल्वे ब्रीजखाली लाईटची व्यवस्था करावी . न केल्यास तेथेही अपघात होण्याची शक्यता आहे.<br>६. अनियमित पाणी पुरवठा - पाणी सोडणेची वेळ निश्चित नाही.<br>७. नवीन लाईनसाठी २० कोटी रुपये खर्च करुन पाईप लाईन करुन सुधा दाण्याचा योग्य तो पुरवठा होत नाही.<br>८. ठराविक कंपन्याना त्यांच्या क्षमतेपेक्षा जादा पाणी दिले जात आहे.<br>९. बाफना मोटर्स ते रेल्वे स्टेशन स्ट्रीट लाईट बंद- ८ दिवस.<br>१०. रेल्वे ऑफीसजवळ १ पोल पडला आहे- गेले २ महिने<br>११. एमआयडीसी ऑफीस समोरच्या रोडवर ४ ते ५ लाईट बंद- २ महिने.<br>१२. गद्रे मरीत ते जे.के.फाईल्स लाईट बंद - गेला १ महिना<br>१३. ब-याच ठिकाणी फिक्सर नाहीत.<br>१४. केबल जमिनीच्या वर आहेत व ब-याच ठिकाणी बाहेरुन वायर जोडुन वायरिंग लोंबकळत आहे.<br>१५. झाडगांव एमआयडीसी नर्मदा सिमेंट ते श्री.इंगवले यांच्या इंडस्ट्री पर्यंतचे स्ट्रीट लाईट गेली दोन वर्षे बंद आहेत व त्या संपूर्ण रोडवरील १५ दिवस लाईट बंद आहे. वारंवार तक्रार करुन सुध्दा कॉन्ट्रॅक्टर दुर्लक्ष करीत आहे. तात्पुरते लाईट सुरु करतात पुन्हा आठ-आठ दिवस त्या साईटवर फिरकत नाहीत व लाईट सतत बंद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | असतात.<br>१६. कॉन्ट्रॅक्टरने नेमलेली माणसे/इलेक्ट्रिशन अकुशल आहेत.<br>१७. कॉन्ट्रॅक्टरचे ऑफीस नाही. मेन्टेनन्स साठी लागणारी गाडी नाही.<br>१८. इलेक्ट्रीकल मटेरियल चांगल्या दर्जाचे नाही.<br>१९. कॉन्ट्रॅक्टरने केलेली कामे असमाधानकारक आहेत.<br>छोटया छोटया बाबी कार्यालयीन स्तरावर सोडवता येणे शक्य असतानाही त्या योग्य प्रकारे स्थानिक अधिकारी सोडवत नसलेबद्दल मा. अध्यक्ष यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी सदर तक्रारी संबधीतांकडे पाठवून औद्योगिक संघटना व एमआयडीसी व महावितरण यांनी दर महिन्याला स्वतंत्र सभा आयोजित करुन त्या समस्या सोडवाव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेपूर्वी सादर करावा. अशा सूचना केल्या.<br>एमआयडीसीकडून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या चर्चेत उद्योजकांचे समाधान झाले नाही त्यावर महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र रत्नागिरी यांनी एमआयडीसी कडून घटकांना क्षमतेपेक्षा जादा पाणी दिले जाते काय याची माहिती घेवून पुढील सभेपूर्वी अहवाल सादर करणेच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. |

वरीलप्रमाणे चर्चा व निर्णय झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सही/-**
**महाव्यवस्थापक,**
**जिल्हा उद्योग केंद्र,रत्नागिरी**

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा उद्योग मित्र समिती, रत्नागिरी**